# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २१/०५/२०२४ (मंगळवार) सायंकाळ**

---

## पोलीस स्टेशन एमआयडीसी बुटीबोरी BPCL कंपनी येथे दहशतवादी हल्ला.
## (दहशतवादी हल्ल्यांचे प्रत्युत्तर देण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलीस सुरक्षा यंत्रणेचे सुसज्जते बाबतचे प्रात्यक्षीक)

पोलीस स्टेशन एमआयडीसी बुटीबोरी अंतर्गत दिनांक २०/०५/२०२४ रोजी २१.११ वा दरम्यान पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी हददीतील BPCL कंपनी एमआयडीसी बोरी येथे दोन बंदुकधारी अतिरेकी यांनी BPCL कंपनी एमआयडीसी बोरी येथे अनाधिकृत प्रवेश करून बंधक बनवुन घेतले आहे. अशी माहीती मिळाल्याने लगेच पोलीस कंट्रोल रूम येथे तसेच मा. वरिष्ठाना माहीती देवुन त्यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे पोलीस स्टॉफ तसेच पोलीस मुख्यालय नाग्रा येथिल QRT व RCP पथक पोलीस स्टेशन बेला, बुट्टीबोरी उमरेड, कोंढाळी, स्थानिक गुन्हे शाखा, जिल्हा विशेष शाखा, सुरक्षा शाखा, वाहतुक शाखा, आर्थिक गुन्हे शाखा, मानव संसाधन विभाग, BDDS पथक नाग्रा, ATS नागपुर यांना घटनास्थळी बोलावुन संयुक्तरित्या विशेष मोहीम राबवुन BPCL कंपनी एमआयडीसी बोरी येथे अनाधिकृत प्रवेश करणा—या अतिरेकी पैकी एकाला ठार करण्यात आले व एकाला जिवंत ताब्यात घेण्याची रंगीत तालीम (मॉक ड्रिल) घेण्यात आली. पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी हद्दीत भविष्यात दहशतवादी हल्ला झाल्यास सदर परिस्थिती हाताळण्यात यावे तसेच पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना सदर परीस्थिती हाताळण्याचा अनुभव यावा म्हणुन मा. पोलीस अधिक्षक साहेबाच्या आदेशाने सदरची रंगीत तालीम घेण्यात आली.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ, मा पोलीस उपअधिक्षक (गृह) श्री विजय माहुलकर, मा उपविभागीय पोलीस अधिकारी नागपुर विभाग नागपुर श्रीमती पुजा गायकवाड मॅडम यांचे मार्गदर्शनात ठाणेदार एमआयडीसी बोरी सपोनि राजीव कर्मलवार, ठाणेदार बुटीबोरी हदयनारायण यादव, ठाणेदार उमरेड पोनि घोंगे, जिल्हा विशेष शाखा पोनि दुर्गे, एटीबी सपोनि बाघोडे, स्थानिक गुन्हे शाखा पोनि ओमप्रकाश कोकाटे, आर्थिक गुन्हे शाखा पोनि नगराडे, मानव संसाधन शाखा पोनि मानकर, पोउपनी सरकार, रामदास खोत, चव्हान, देशमुख, पालीवाल, सरवर व इतर पोस्टेचे व शाखेचे एकुन २१ अधिकारी व १४२ अमंलदार यांनी पार पाडली.

## बकरी चोरी करणाऱ्या आरोपीस नागपूर ग्रामीण पोलीसांनी केले अटक

फिर्यादी नामे— विजय महादेवराव गजाम, वय ४५ वर्ष, रा. कोलु ता. काटोल याचे दि. १६/०५/२०२४ चे रात्री ते दि. १७/०५/२०२४ चे रात्री ०२.०० वा. सुमारास बकरीचे एकुण १० पिल्ले तुराटीचे कोठयातून कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे. अशा फिर्यादीच्या रीपोर्ट वरून पोस्टे काटोल येथे अप क्र. ३८०/२४ अन्वये गुन्हा केला होता.

सदर गुन्हयाचे तपासात अज्ञात आरोपीचा शोध काटोल पोलीस घेत असता मिळालेल्या गोपनीय माहिती वरून **आरोपी राजविर झेलसिंग डांगी, वय १८ रा. कबाडी मोहल्ला पांढुर्णा एम. पि** यास काटोल पोलीसांनी पांढुर्णा येथुन ताब्यात घेतले. आरोपीस सदर गुन्हयाबाबत सखोल विचारपुस केली असता उडवाउडविचे उत्तरे दिली. अधिक विचारपुस दरम्यान आरोपीने सदरचा गुन्हा केल्याचे कबुली दिली. आरोपीकडुन नगदी २६,०००/—रू.,गुन्हयात वापरलेली विनानंबरची होंडा शाईन मोटरसायकल किंमती ५०,०००/—रू. असा एकुण ७६,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे काटोल येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक निशांत मेश्राम, सपोनि शिवाजी नागवे, पोहवा कैलास उईके, पोना भूषण मदनकर, पोशि गौरव बखाल यांनी पार पाडली.

## मोबाईल चोरी करणाऱ्या आरोपीस अटक

फिर्यादी नामे— पंकज शंकर कुंभलकर, वय ३१ वर्ष, रा. वार्ड क्र. ०३ पारशिवनी हा आठवडी बाजार करीत असतांना अज्ञात आरोपी यांने फिर्यादीचे खिशात ठेवलेला सॅमसंग कंपनीचा जुना वापरता मोबाईल किमती १०,०००/—रू चा चोरून नेल्याचे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोस्टे पारशिवनी येथे अप क्र. १५६/२४ कलम ३७९ अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

सदर गुन्हयाचे तपासात आरोपीचा शोध घेत असता पारशिवनी येथील आठवडी बाजार येथे पोस्टे पेट्रोलींग दरम्यान फिर्यादीने सांगितलेल्या कपडयाच्या आरोपीचे वर्णनावरून **आरोपी नामे— मोहम्म्द अब्दुल अंसारी वल्द मोहम्मद मुरसीद अंसारी वय २६ वर्ष रा. बडा मदनसाही तह. बडा मदनसाही, पो.स्टे. शिक्षवाडी, जिल्हा—साहीबगंज राज्य—झारखंड ह. मु. ताजबाग नागपुर** यास ताब्यात आरोपीस सदर गुन्हयाबाबत सखोल विचारपुस केली असता गुन्हयाची कबुली दिली. त्याच्याकडुन ०१ सॅमसंग मोबाईल किंमती १०,०००/—रू. तसेच अप क्र. १५७/२४ कलम ३७९ भादंवि चे गुन्हयातील एक ओपो कंपनीचा मोबाईल किंमती ७०००/—रू. व रिअलमी कंपनीचा मोबाईल किमती ८०००/—रू. असा एकुण २५,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे पारशिवनी येथील ठाणेदार पोनि राजेशकुमार थोरात, सफौ रामराव पवार, पोशि सुर्यप्रकाश वावरे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर